राज्यातील खरीप २०१८ हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत. (नाशिक/अमरावती विभाग)

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-०७/२०१९/प्र.क्र.४६/म-११**
**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन प्रभाग)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -५ सप्टेंबर, २०१९.

**संदर्भ** :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म- ७, दि. ३१/१०/२०१८, दिनांक २५/०१/२०१९,दिनांक१४/०२/२०१९, दि.२१/०२/२०१९, दि.१०/७/२०१९, दि.४/९/२०१९.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१०/म-११, दिनांक २९/०१/२०१९ व दिनांक १४/०२/२०१९ , दिनांक २१/२/२०१९ रोजीचे पत्र, शासन निर्णय दि.१५/७/२०१९.

३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक ४/९/२०१९.

**प्रस्तावना** :-

राज्यातील खरीप हंगाम -२०१८ मध्ये दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करुन राज्यात १५१ तालुक्यामध्ये दिनांक ३१/१०/२०१८च्या शासन निर्णयान्वये अन्वये दुष्काळ घोषित करण्यात आला. सदर तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना कृषि विषयक मदत वाटपाकरीता संदर्भ क्र.१ मध्ये नमूद शासननिर्णयान्वये निधी उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार संदर्भ क्र.२ येथे नमूद शासन निर्णय व पत्रानुसार संबंधित जिल्हयांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

विभागीय आयुक्त, नाशिक व अमरावती यांच्या अतिरिक्त निधी मागणीनुसार दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या जिल्हयातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने मदत वाटप करण्यासाठी निविष्ठा अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक ७/८/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.०३ येथील शासन निर्णय दिनांक ४/९/२०१९ अन्वये निधी उपलब्ध करून देण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर शासन निर्णयानुसार नाशिक व अमरावती विभागातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने मदत वाटप करण्यासाठी संबंधित विभागांना लेखाशीर्ष (२२४५ २४३४) अंतर्गत रुपये ३१८,३५,९०,०००/- इतका निधी वाटप करण्यासाठी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

राज्यातील खरीप हंगाम-२०१८मध्ये ३१/१०/२०१८ च्या शासननिर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या नाशिक व अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने मदत वाटप करण्यासाठी **एकूण रक्कम रु.३१८,३५,९०,०००/- (तीनशे अठरा कोटी पस्तीस लक्ष नव्वद हजार फक्त)** इतका अतिरिक्त निधी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे विभागीय आयुक्त, औरंगाबाद व नागपूर यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | वितरीत करावयाची रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १ | अमरावती | अमरावती | ७३८.९५ |
| २ | | अकोला | ६१४९.७५ |
| ३ | | यवतमाळ | १६६९.४९ |
| ४ | | बुलढाणा | ८९२२.३७ |
| **एकूण अमरावती** | | | **१७४८०.५६** |
| १ | नाशिक | नाशिक | १७९९.११ |
| २ | | धुळे | ५६६९.९१ |
| ३ | | नंदुरबार | १६०.२५ |
| ४ | | जळगांव | २४३५.२८ |
| ५ | | अहमदनगर | ४२९०.७९ |
| **एकूण नाशिक** | | | **१४३५५.३४** |
| **वितरीत करावयाची एकूण रक्कम (रु.लाखात)** | | | **३१८३५.९०** |

२. सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मागणी क्रमांक सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य (योजनेत्तर),०१ अवर्षण, १०१ अनुग्रह सहाय्य, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च, (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), **(२२४५ २४३४)** या उपलेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीतून विभागीय आयुक्त, नाशिक/अमरावती यांना स्तंभ क्रमांक३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे, सदर शीर्षाखाली तो अंतीमत: खर्ची दाखविण्यात यावा. तसेच तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निधी वाटपाच्या मर्यादेतच संबंधित जिल्ह्यांना निधी वितरीत होईल, याची दक्षता विभागीय अायुक्त कार्यालयाने घ्यावी.

३. **<u>बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करताना शासननिर्णय संदर्भ क्रमांक १ व ३ मधील अटी, शर्तींची पूर्तता करण्याची दक्षता घ्यावी व त्यात नमूद मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.</u>**

४. **अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (BEAMS) वर उपलब्ध निधी अनावश्यक रितीने कोषागारात आहरीत करुन तो वाटपा अभावी बँकेत पडून राहणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे आदेश वेळोवळी देण्यात आलेले आहेत, असे असतानाही कोषागारातून रक्कम आहरीत करुन बँकेत ठेवले असल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. यास्तव निधी आहरीत करुन बँकेत ठेऊ नये, अशा सक्त सूचना या शासन निर्णयान्वये पुन:श्च देण्यात येत आहेत. अशी बाब आढळून आल्यास त्याला तात्पुरता अपहार समजून, संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

५. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे याची सर्व विभागीय आयुक्त यांनी खातरजमा करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख/नोंदवहया विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरित व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे दरमहा होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यत संबंधित विभागीय आयुक्त, यांनी एकत्रित महसूल व वन विभागास न चुकता सादर करावी तसेच झालेल्या खर्चाची महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे **<u>उपयोगिता प्रमाणपत्र</u>** या विभागाकडे तात्काळ सादर करावे. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी.

६. **नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित व्यक्तींना वाटप करण्यासाठी वितरित करण्यात येणारा निधी तालुकास्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये हस्तांतरित केला जातो. काही बँका लाभार्थ्यांचे नाव, खाते क्रमांक जुळत नाही, अशा तांत्रिक कारणास्तव परत आलेला निधी निलंबन (Suspense) खात्यात ठेवतात. वास्तविक पाहता बँकाकडे वर्ग करण्यात आलेली रक्कम एकतर लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणे आवश्यक आहे किंवा परत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या खात्यात जमा होणे आवश्यक आहे. तथापि, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या खात्यात अशा रकमा जमा करण्याऐवजी बँका त्या निलंबन खात्यामध्ये ठेवतात, कालांतराने अशा रकमा ताळमेळविना राहतात आणि ज्या रकमा शासनाकडे परत जमा व्हावयास हव्या त्या बँकाकडे पडून राहतात. याला आळा घालण्यासाठी ठराविक कालावधीने सदर रकमांचा ताळमेळ घेणे अत्यंत गरजेचे आहे. तरी सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी दर आठवडयाला वर्ग करण्यात येणाऱ्या रकमांचा ताळमेळ घेण्याची कार्यवाही करावी. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतांना अशा ताळमेळानंतरच लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या रकमा विचारात घेऊन सादर करण्यात यावे.**

७. नियंत्रक अधिकाऱ्यांनी अनुदान वाटपाची एक प्रत सचिव (मदत व पुनर्वसन) यांना न चुकता सादर करावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार/उप कोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या बिलासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक चिठ्ठीमध्ये गौण / उपशिर्षाच्या संगणक संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा, असे आदेश कृपया संबंधित अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकाऱ्यांनी दयावेत. तसेच कोषागारातून/उप कोषागारातून आहरित केलेल्या रकमेचा अहवाल शासनास सादर करावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०५१५५७२४७५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.09.05 16:12:29 +05'30'

**( राजश्री राऊत )**
**वित्तीय सल्लागार व सह सचिव**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
२. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३. सर्व लोकसभा सदस्य /राज्यसभा सदस्य (महाराष्ट्र)
४. सर्व विधानसभा सदस्य /विधान परिषद सदस्य.
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
६. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन), मंत्रालय,मुंबई
१०. महालेखापाल -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
११. महालेखापाल -१ /२ (लेखा परिक्षा ), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१२. विभागीय आयुक्त, नाशिक/अमरावती.
१३. वित्त विभाग, (व्यय -९ / अर्थस.-६ ), मंत्रालय , मुंबई.
१४. कार्यासन अधिकारी,महसुल व वन विभाग, (म-७ ),मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवड नस्ती,(कार्यासन म-११)